ISSN 2249-4081

*National Registered and Recognized*
*Research Journal Related to Higher Education for Economics & Commerce*

# GLOBAL ECONOMIC RESEARCH



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani

Issue : XX, Vol. II
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2249-4081
Oct. 2020 To Mar. 2021

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Contribution of FDI in Indian Economy to Make in India<br>**Avinash Ramkrishna Pawar** | 1 |
| 2 | R. C. Dutt Thoughton Famines: Nature, Causes, Effects & Policy<br>**Dr. P. T. Pawar** | 8 |
| 3 | Agro-Tourism in India: Concept, Opportunities & Challenges<br>**Dr. Keshao S. Gulhane** | 17 |
| 4 | E-Banking System in India: Changing with Time<br>**Dr. R. D. Ganapure** | 24 |
| 5 | Higher Education Sector in India: Problems& Solutions<br>**Dr. Nilam Chhangani** | 33 |
| 6 | भारतातील कापड उद्योगाची सद्यस्थिती<br>**अशोक दौलतराव चव्हाण** | 42 |
| 7 | पूर्व विदर्भातील धान उत्पादनाच्या स्थितीचे अध्ययन<br>**डॉ. ज्योती एच. लाहोटी, कु. सुलभा गुलाबराव वानखडे** | 47 |
| 8 | करोना विषाणुमुळे शैक्षणिक क्षेत्रात झालेले बदल व त्याची समर्पकता<br>**गणेश बाबुराव दराडे** | 54 |



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

Issue : XX, Vol. II
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2249-4081
Oct. 2020 To Mar 2021 

# भारतातील कापड उद्योगाची सद्यस्थिती

**अशोक दौलतराव चव्हाण**
वाणिज्य विभाग,
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी

## RESEARCH PAPER - COMMERCE

6

भारतात कापड उद्योग हा जुना उद्योग आहे. आधुनिक कापड उद्योगाची सुरुवात १८१८ मध्ये कलकत्ता येथे कापड गिरण्याच्या स्थापनेने झाली त्यानंतर १८५४ मध्ये मुंबई येथे कापडगिरणी सुरु झाली, मुंबईनंतर अहमदाबाद, नागपूर, सोलापूर येथे कापड गिरण्या सुरु झाल्या. भारतात मुख्यत्वे कापूस उत्पादन पंजाब, हरियाणा, राजस्थान, ओरिसा, गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तामीळनाडू आणि कर्नाटक या राज्यातून केले जाते. कापूस हे खरीप हंगामात येणारे पीक आहे. त्याचा कालावधी सहा ते आठ महिन्यापर्यंत असतो हे पीक पावसाच्या पाण्यावरही घेतले जाते व जलसिंचनावरून घेतले जाते जलसिंचनाद्वारे कापसाचे उत्पादन हे पंजाब, हरियाणा, गुजरात आणि राजस्थान या राज्यात जास्तीत जास्त जलसिंचनाद्वारे कापसाचे उत्पादन घेतले जाते. म्हणजेच जवळ जवळ ८० टक्के जलसिंचनाद्वारे उत्पादन या चार राज्यातून घेतले जाते. म्हणन या राज्यातून कापसाची लागवड एप्रील-मे मध्ये होते व जानेवारी-फेब्रुवारीपर्यंत हे पीक राहते. भारतात सर्वात जास्त कापूस महाराष्ट्र व गुजरात राज्यात पिकवला जातो. त्यातल्या त्यात गुजरात राज्यात भारतात प्रथम क्रमांक आहे.

भारतात सर्वात जुना उद्योग आहे तसेच या उद्योगातून यंत्रावर तयार होणारे कापड व हातमागावर तयार होणारे कापड असे दोन्ही पध्दतीने उत्पादन केले जाते. सद्य परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला गेल्यामुळे हातमागावर व लघुउद्योगातून कापड निर्मिती उद्योगासमोर मोठी समस्या उभी राहिलेली आहे.

कापड उद्योग हा भारतातील सर्वात मोठा उद्योग आहे. एकूण औद्योगिक उत्पादनाच्या २०

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Par

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani



टक्के वाटा कापड उद्योगाचा आहे. तसेच २० दशलक्ष लोक या उद्योगात काम करतात व एकूण निर्यातीत कापड उद्योगा पासून ३३ प्रतिशत एवढी मिळकत मिळते.

कापड उत्पादनाच्या बाबतीत जगात बारताचा दुसरा नंवर आहे पहिला नंवर चीनचा आहे. प्रस्तुत अभ्यास करण्यामागचा उद्देश या महत्त्वाच्या उद्योगाची सद्यस्थिती काय आहे हा आहे.

**अभ्यासाचे उद्देश :**

१. भारतातील कापड उत्पादनाचा अभ्यास करणे.

२. भारतात दरमानसी कापडाचा उपभोग अभ्यासणे.

३. भारतातून होणाज्या कापड निर्यातीचा विचार करणे.

**भारतातील कापड उत्पादन :**

खालील तक्त्यात भारतातील कापड उद्योगातून होणाज्या उत्पादनाचा अभ्यास केलेला आहे.

**भारतातील कापड उत्पादन**

(दशलक्ष स्के.मीटर)

| वर्षे | कारखाना क्षेत्र (केद्रीत) | विकेंद्रीत क्षेत्र | एकूण | दोन्ही क्षेत्राचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कारखाना क्षेत्र | विकेद्रीत क्षेत्र |
| १९५०-५१ | ३७३० | १०१० | ४७४० | ७९ | २१ |
| १९७०-७१ | ४०५० | ३५५० | ७६०० | ५३ | ४७ |
| १९९०-९१ | २५९० | २०३४० | २२९३० | ११ | ८९ |
| २०००-०१ | १६७० | ३८५६३ | ४०२३३ | ४ | ३६ |
| २००९-१० | २०१६ | ५८३१७ | ६०६३३ | ३ | ९७ |
| २०११-१२ | २३१३ | ५८१४० | ६०४५३ | ४ | ९६ |

Source : Economic Survey, २०११-१२

Datta, Sundharam, Indian Economy (various issue)

वरील तक्त्यामध्ये भारतातील कापड उत्पादनाचा अभ्यास केलेला आहे. यात दोन भाग कारखाना क्षेत्र (केंद्रीत) आणि विकेंद्रीत क्षेत्र. १९५०-५१ साली जवळजवळ ४७४० दशलक्ष स्के.मीटर एवढे कापडाचे उत्पादन होत होते. त्यात सातत्याने सर्वसाधारणपणे वाढ झालेली दिसून येते २०११-१२ मध्ये ६०४५३ दशलक्ष स्के.मीटर एवढे कापडाचे उत्पादन झालेले होते. ही वाढ अतिशय मोठ्या प्रमाणात झालेली दिसून येते.

मात्र कारखाना क्षेत्राचे प्रमाण झपाट्याने कमी झालेले असून विकेंद्रीत क्षेत्रातील उत्पादनाचे

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist...

Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist Parbhani

Issue : XX, Vol. II
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2249-4081
Oct. 2020 To Mar 2021 

प्रमाण वाढलेले दिसून येते संबंधीत कालावधीत कारखाना क्षेत्राचे प्रमाण कमी होवून ते ७७ टक्क्यावरून ४ टक्के इतके कमी झालेले आहे तर विकेंद्रीत क्षेत्राचे प्रमाण २१ टक्क्यावरून ९६ टक्क्यापर्यंत वाढत गेलेले दिसून येते. विकेंद्रीत क्षेत्रात हातमाग व पावरलूम क्षेत्रात वाढ झालेली दिसून येते.

**भारताची कापड निर्यात :**

खालील तक्त्यात भारतातून कापडाची होणारी निर्यात याचा अभ्यास केलेला आहे.

**भारताची कापड निर्यात (दशलक्ष डॉलर)**

| वर्ष | एकूण निर्यात | कापड निर्यात | एकूण निर्यातीत प्रमाण | विकास दर |
|---|---|---|---|---|
| २००२-०३ | ५२३७० | १२४४५ | २३.८ | - |
| २००३-०४ | ६३६२२ | १३५३२ | २१.३ | ८.७ |
| २००४-०५ | ८३५०१ | १४०२१ | १६.८ | ३.६ |
| २००५-०६ | १०२७१० | १७८८५ | १७.४ | २७.६ |
| २००६-०७ | १२६२६३ | १९४१६ | १५.२ | ७ |
| २००७-०८ | १६२९०४ | २२१४६ | १३.६ | १५.६ |
| २००८-०९ | १८२८०० | २००१६ | ११.० | -९.६ |
| २००९-१० | १७८१५१ | १९८५३ | ११.१ | -०.८ |
| २०१०-११ | २५४४०२ | २३३१२ | ९.२ | १७.४ |
| २०११-१२ | ३०४६२४ | ३३३१० | १०.९ | २०.१ |
| २०१२-१३ | ३००४०० | ३१६२५ | १०.५ | -५.१ |
| २०१३-१४ | ३१२६१० | ३५४२६ | ११.३ | १२.० |

Source : १) Annual Report २०१३-१४, Ministry of Textiles, Govt. of India.
२) Datta Sundharam, Indian Economy, २०१८, p.६९७

भारतातून विदेशात कापडाची निर्यात २००२-०३ पासून २०१३-१४ पर्यंत कशी होती हे वरील तक्त्यात दाखवलेले आहे. कापड निर्यातीचे एकूण निर्यातीशी असणारे प्रमाण दाखवलेले आहे. २००२-०३ मध्ये एकूण निर्यात ५२३७० दशलक्ष डॉलर एवढी होती. त्यापैकी कापड उद्योगातून होणारी निर्यात १२४४५ दशलक्ष डॉलर एवढी होती व एकूण निर्यातीत कापड उद्योगाचा वाटा २३.८ प्रतिशत एवढा होता. २०१३-१४ साली एकूण निर्यात ३१२६१० दशलक्ष डॉलर एवढी होती. त्यापैकी कापडाची निर्यात ३५४२६ दशलक्ष डॉलर एवढी होती. एकूण निर्यातीशी असणारे प्रमाण ११.३ प्रतिशत एवढे होते. एकूण निर्यातीत कापड उद्योगाचा वाटा सातत्याने १० प्रतिशतपेक्षा जास्त राहिलेला आहे.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



**भारतातील कापडाचा दरडोई उपभोग :**

खालील तक्त्यात भारतातील दरवर्षी दरमाणसी लागणाऱ्या कापडाचा अभ्यास केलेला आहे.

**दरडोई कापडाचा उपभोग (मीटरमध्ये)**

| काळ | उपभोग |
|---|---|
| १९६०-६१ | १५.० |
| १९८०-८१ | १७.३ |
| २०००-०१ | ३०.७ |
| २००७-०८ | ४१.९ |
| २००८-०९ | ३९.० |
| २०११-१२ | ४०.५ |
| २०१२-१३ | ३८.५ |

Source : १) Annual Report २००८-०९, Ministry of Textiles, Govt. of India.

२) Economy Survey २०१४-१५

वरील तक्त्यात दरडोई कापडाच्या उपभोगाचा विचार केला आहे. गांधीजी म्हणत असत की भारतीयांना दरवर्षी दरडोई १३ वार कापड लागते व तेवढे कापड निर्माण करण्याची क्षमता भारताची आहे. त्यामुळे भारत कापडाच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. म्हणजेच भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात दरडोई १३ वार मीटर कापडाचा उपभोग होता. १९६०-६१ साली तो १५ मीटर पर्यंत वाढला. कापडाचा उपभोग सतत वाढत गेलेला दिसून येतो तो २०१२-१३ मध्ये ३८.५ मीटरपर्यंत वाढत गेलेला दिसून येतो.

**निष्कर्ष :**

१. कापड उत्पादनात फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. १९५०-५१ साली हे ४७४० दशलक्ष स्क्वे.मीटर होते त्यात वाढ होऊन २०११-१२ साली ते ६०४५३ दशलक्ष स्के.मीटर एवढे झाले. यावरून उत्पादनात फार मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.

२. उत्पादनात वाढ होत असताना कारखाना क्षेत्राचा वाटा कमी होताना दिसून येतो व विकेंद्रीत क्षत्राचा वाटा वाढताना दिसून येतो. संबंधीत कालावधीत कारखाना क्षेत्राचा वाटा ७९ प्रतिशत वरून ४ प्रतिशत पर्यंत कमी झालेला आहे. तर विकेंद्रित क्षेत्राचा वाटा २१ प्रतिशत वरून ९६ प्रतिशत पर्यंत वाढलेला आहे.

३. भारताचा कापड उत्पादनाचे बाबतीत जगात दुसरा क्रमांक आहे. पहिला क्रमांक चीनचा तर दुसरा क्रमांक भारताचा आहे. तर भारतात मुख्यतः १० राज्यात कापसाची लागवड

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

केली जाते त्यात गुजरातचा पहिला तर महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे.

४. एकूण निर्यातीचा विचार केला तर २००२-०३ पासून एकूण निर्यात व कापडाची निर्यात वाढलेली दिसून येते. त्यातल्या त्यात कापडाची निर्यात २०१०-११ अपवाद वगळता सातत्याने वाढत गेलेली दिसून येते. २००२-०३ मध्ये १२४४५ दशलक्ष डॉलर एवढी होती २०१३-१४ साली ३५४२६ दशलक्ष डॉलरपर्यंत वाढत गेलेली आहे.

५. एकूण निर्यातीत कापड उद्योगाचा वाटा सातत्याने सर्वसाधारणपणे १० प्रतिशत पेक्षा जास्त राहिलेला आहे.

६. भारतात स्वातंत्र्यानंतर कापड उपभोगामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. १९६०-६१ साली हा उपभोग १५ मीटर एवढा होता त्यात वाढ होऊन तो २०१२-१३ साली ३८.५ मीटर एवढा झाला.

## संदर्भ सूची :-

१. A.N. Agrawal - Indian Economy
२. R.r. Barthwal - Industrial Economics
३. M.D. Godbole - Industrial Dispersal Policies.
४. Datta/Sundharam - Indian Economy (various issues)
५. प्रा.रायखेलकर/डांगे - औद्योगिक अर्थशास्त्र
६. प्रा.पत्की - औद्योगिक अर्थशास्त्र

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani